**महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी,**
**२३५ पेनिनसुला हाऊस, ३ रा मजला, डॉ. दादाभाई नौरोजी रोड,**
**फोर्ट, मुंबई ४००००१**
फोन (०२२) २२७०४४०१, २२७०३०८६
E-mail : mail@mchmumbai.org Website - www.mchmumbai.org

**विषय – महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी मुंबई द्वारा क्युआर कोड (QR Code) चा परिचय**

प्रिय डॉक्टर,

आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी, मुंबई द्वारा सत्यापित प्लॅक कार्ड (**QR Code**) आपणास पुरविला जात आहे.

सार्वजनिक आरोग्य आणि सुरक्षेसाठी गंभीर धोका निर्माण करणाऱ्या बनावट वैद्यकीय व्यवसायींना प्रतिबंध करण्यासाठी राज्यातील सर्व वैद्यकीय परिषदेतर्फे हे केले जात आहे. आपल्या वैद्यकीय व्यवसायामध्ये सत्यापित प्लॅक कार्ड (**QR Code**) दवाखान्याच्या नामफलकावर किंवा त्याशेजारी ठळकपणे दिसेल असा लावण्यात यावा. जेणेकरुन सदरील वैद्यकीय व्यवसायी अधिकृत वैद्यकीय व्यवसायी आहे याची खात्री नागरिकांना होईल.

सदरील सत्यापित प्लॅक कार्ड (**QR Code**) परिषदेकडे आपल्या नोंदणीमध्ये नमूद असलेल्या पत्त्यावर पाठविण्यात येत आहे. सर्व नोंदणीकृत समचिकित्सा व्यावसायिकांना विनंती आहे की, त्यांनी त्यांची माहिती (नाव, अर्हता, परिषदेकडे नोंद केलेल्या अतिरिक्त अर्हता, पंजीकरण, नुतनीकरण, पत्ता, मोबाईल क्रमांक, आधार कार्ड नंबर, ई-मेल आयडी इ.) अद्ययावत केलेली नसेल तर परिषदेच्या संकेतस्थळावर दि. २५.५.२०२५ नंतर उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या लिंक वर माहिती अपडेट करावी. तसेच नावात बदल, अतिरिक्त अर्हता, नोंदणी नुतनीकरण, पत्त्यातील बदल इ. माहिती परिषदेच्या संकेतस्थळावरील योग्य तो फॉर्म भरुन योग्य त्या शुल्कासह व कागदपत्रांसह माहिती अद्ययावत करावी.

तसेच परिषदेकडून **KNOW YOUR DOCTOR** हे ॲप तयार करण्यात आले असून सदर ॲप **Andorid & Apple (IOS)** या प्रणालीवर दिसणार आहे, याची नोंद घ्यावी.

**प्रबंधक**
**महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी**
**मुंबई**

MAHARASHTRA COUNCIL OF HOMOEOPATHY • MUMBAI •

ठिकाण – मुंबई
दि.- २० मे २०२५

**टिप** – सदरील सत्यापित प्लॅक कार्ड (QR Code) प्रथमतः सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांना विनाशुल्क देण्यात येत आहे.